प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
ई-मेल/email : helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, शहीद भगत सिंह मार्ग, फोर्ट, मुंबई - 400 001
Department of Communication, Central Office, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai - 400 001 फोन/Phone: 022 - 2266 0502

**10 जुलै 2025**

# भारतीय रिझर्व्ह बँकेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, नागपूर, महाराष्ट्रला आर्थिक दंड ठोठावला

भारतीय रिझर्व्ह बँकेने (RBI) 08 जुलै 2025 रोजीच्या आदेशानुसार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, नागपूर, महाराष्ट्र (बँक) वर 'संचालक, नातेवाईक आणि ज्या फर्म्स/संबंधांमध्ये त्यांना रस आहे, त्यांना कर्ज आणि ॲडव्हान्स (UCBs)' संबंधी निर्देश आणि पर्यवेक्षी कृती फ्रेमवर्क (SAF) अंतर्गत आरबीआय ने जारी केलेल्या विशिष्ट निर्देशांचे पालन न केल्याबद्दल ₹1.50 लाख (रुपये फक्त एक लाख पन्नास हजार) दंड ठोठावला आहे. बँकिंग नियमन कायदा, 1949 (BR कायदा) च्या कलम 46(4)(i) आणि कलम 56 सह लागू असलेल्या कलम 47A(1)(c) अन्वये आरबीआयला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करून हा दंड ठोठावण्यात आला आहे.

31 मार्च 2024 रोजीच्या आर्थिक स्थितीवर आधारित बँकेची वैधानिक तपासणी आरबीआय द्वारे केली गेली होती. या तपासणी अहवालातील पर्यवेक्षी निष्कर्षांचे पालन न केल्याने आणि यासंबंधी केलेल्या पत्रव्यवहाराच्या आधारे बँकेला नोटीस बजावण्यात आली होती, ज्यामध्ये बँकेने दिलेल्या निर्देशांचे पालन न केल्याबद्दल तिला दंड का लावू नये याची कारणे दाखवा अशी विचारणा करण्यात आली होती. नोटीसला बँकेने दिलेले उत्तर व वैयक्तिक सुनावणीच्या वेळी बँकेने सादर केलेले तोंडी निवेदन विचारात घेता आरबीआय इतर गोष्टींसहीत या निष्कर्षावर पोहोचली की, बँकेविरुद्धचे खालील आरोप सिद्ध होत आहेत आणि आर्थिक दंड लावला जाणे आवश्यक आहे.

बँकेने

(i) संचालकांशी संबंधित कर्ज मंजूर केले आहे; आणि

(ii) SAF अंतर्गत निर्देशांचे पालन न करता, नवीन कर्जे आणि अग्रिम धन (ॲडव्हान्ससाठी), लागू असलेल्या नियामक मर्यादेच्या 50% ने एकल कर्जदार एक्सपोजर मर्यादा कमी केली नाही.

ही कृती नियामक अनुपालनातील कमतरतांवर आधारित आहे आणि यात बँकेने तिच्या ग्राहकांशी केलेल्या कोणत्याही व्यवहारांच्या किवा करारांच्या वैधतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्याचा हेतू नाही. तसेच, बँकेविरुद्ध आरबीआयने सुरू केलेल्या इतर कोणत्याही कारवाईबद्दल पूर्वग्रह न ठेवता हा आर्थिक दंड लावला आहे.

प्रेस प्रकाशनी : 2025-2026/689

पूनीत पंचोली
मुख्य महाप्रबंधक